# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १६ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- महानगरपालिका निवडणुकीची आज मतमोजणी, राज्यात सरासरी ५० टक्क्यांहून अधिक मतदान झाल्याचा राज्य निवडणूक आयोगाचा अंदाज
- मराठवाड्यात जालन्यात सर्वाधिक ६१ पूर्णांक १६ टक्के तर छत्रपती संभाजीनगर इथं ५९ पूर्णांक ८२ टक्के मतदान
- छत्रपती संभाजीनगर इथं बोगस मतदान प्रकरणी आठ महिलांना अटक
- मतदारांच्या बोटाची शाई पुसणं अशक्य-निवडणूक आयोगाचा निर्वाळा
- आणि
- १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्रक्रिया आजपासून

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांसाठी काल झालेल्या मतदानाची आज मोजणी होणार आहे. सकाळी साडे दहा वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. राज्यात सर्वच टपाली मतपत्रिकांच्या पेट्या आज मतमोजणीपूर्वी अभिरक्षा कक्षातून बाहेर काढण्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिले आहेत. टपाली मतपत्रिकांचं प्रभागनिहाय विलगीकरण देखील त्याचवेळेला करण्यात येणार असल्याचं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं चिकलठाणा औद्योगिक वसाहत, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, तसंच जालना रस्त्यावर सेंट फ्रांसिक शाळा या

चार ठिकाणी मतमोजणी होणार आहे. या परिसरात वहातुकीत बदल करण्यात आला असून, नागरीकांनी याची नोंद घेण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.
जालना इथं औद्योगिक वसाहतीत सिद्धिकी इंजिनिअरिंग परिसरात, लातूरला महिला तंत्रनिकेतन इथं, तर नांदेडमध्ये शासकीत तंत्रनिकेतन महाविद्यालयात मतमोजणी होणार आहे.
राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जिल्हा प्रशासनाने मतमोजणीसाठी चोख नियोजन केलं असून, परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

****

काल सर्व महानगरपालिकांमध्ये मिळून सरासरी ५० टक्क्यांहून अधिक मतदान झाल्याचा अंदाज राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी व्यक्त केला. गेल्यावेळेच्या निवडणुकीपेक्षा यंदा अधिक मतदान झाल्याची माहिती त्यांनी दिली. काल काही किरकोळ अपवाद वगळता, शांततेत पार पडलेल्या या मतदान प्रक्रियेनंतर सर्व महापालिकांच्या ८९३ प्रभागांतल्या, दोन हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी, निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या १५ हजार ९३१ उमेदवारांचं राजकीय भवितव्य इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात बंद झालं.
या निवडणुकीत मतदारांनी कोणाला कौल दिला आहे, हे चित्र दुपारपर्यंत स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

****

मराठवाड्यातल्या पाच महापालिकांपैकी छत्रपती संभाजीनगर इथं ५९ पूर्णांक ८२ टक्के मतदान झालं.

****

जालना महानगरपालिकेसाठी एकूण ६१ पूर्णांक १६ टक्के मतदान झालं. सर्व २९१ केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीतपणे पार पडली आहे. काही मतदान केंद्रावर सायंकाळी उशिरापर्यंत मतदान सुरु होतं, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी दिली.

****

लातूर इथं ६० पूर्णांक शून्य आठ, परभणी इथं ५५ पूर्णांक ५९ टक्के, तर नांदेड इथं ६१ पूर्णांक ३७ टक्के मतदानाची नोंद झाली.

****

मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी विविध आस्थापनांकडून अनेक आकर्षक योजना काल राबवल्या. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून..

**छत्रपती संभाजीनगर इथं सामाजिक कार्यकर्ते सुमीत पंडित यांनी आपल्या केशकर्तनालयात मतदान करून आलेल्या पुरुषांची मोफत दाढी कटिंग करण्याची योजना जाहीर केली होती. काल दिवसभरात ३३ पुरुषांनी त्यांच्या या योजनेचा लाभ घेतला. मतदान केलेल्या महिलांचा पंडित यांच्या संस्थेच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.**

**लातूर इथं कापड दुकानाच्या वतीने मतदान करून आलेल्या मतदारांना विशेष सवलतीच्या दरात कापड विक्री करण्यात आली. मतदान करून आलेल्या पहिल्या १५१ महिला मतदारांना दीड हजार रुपये किमतीची साडी अवघ्या १०० रुपयांत तर पहिल्या १५१ पुरुष मतदारांना एक हजार रुपये किमतीचे सफारी सूटचे कापड फक्त १०० रुपयांत देण्यात आलं.**

****

परभणी इथं १०२ वर्षीय मतदार दादाराव देशमुख यांनी मतदान केंद्रावर येऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. लोकशाहीसाठी सर्व नागरिकांनी मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

दरम्यान, परभणी इथं प्रभाग क्रमांक चार मधल्या एका मतदान केंद्रावर मतदान यंत्रात बिघाड झाला होता, मात्र तातडीनं युनिट दुरूस्ती केल्यानं मतदान प्रक्रिया सुरळीत झाली.

नांदेड महापालिकेच्या २० प्रभागातील ८१ जागांसाठी शांततेत मतदान झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दिली. सायंकाळी पाच वाजेनंतर मतदान केंद्रावर मतदारांच्या मोठ्या रांगा लागल्याचं दिसून आलं होतं.

****

सर्वच महापालिकांसाठी प्रभागनिहाय तीन, चार किंवा पाच मतदान करण्याची ही पहिलीच वेळ होती, प्रभागनिहाय मतदानाबाबत मतदारांमध्ये उत्सुकता दिसून आली. छत्रपती संभाजीनगर इथली नवमतदार गायत्री कुलकर्णी हिच्यासह इतर नवमतदारांनी आपल्या प्रतिक्रिया या शब्दात व्यक्त केल्या..

**बाईट–फर्सट वोटरस**

****

धुळे शहरातल्या एका मतदान केंद्रावर मतदान यंत्राची तोडफोड करण्यात आल्याची घटना घडली. पोलीस आणि निवडणूक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

नाशिक इथं काही ठिकाणी पैसे वाटपाच्या तक्रारीनंतर नागरिकांनी गर्दी केली. गर्दी आटोक्यात आणण्यासाठी पोलीसांना सौम्य बळाचा वापर करावा लागला. एका उमेदवाराची दुचाकीही पोलिसांनी जप्त केली.

अहिल्यानगर इथंही बनावट ओळखपत्र दाखवून मतदानाचा प्रयत्न करणाऱ्या इसमांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आठ बोगस महिला मतदारांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलं. या सर्व महिला, मतदानाचा प्रयत्न करत असताना, हा प्रकार उघड झाला.

दरम्यान, मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करूनही १५५ कर्मचारी काल कर्तव्यावर हजर राहिले नाहीत. या सर्व कर्मचाऱ्यांविरोधात छत्रपती संभाजीनगर महापालिकेने गुन्हा दाखल केला आहे.

****

राज्यात काल मतदानाला सुरुवात झाल्यानंतर बोटाला लावलेली शाई पुसून पुन्हा मतदान केलं जात असल्याच्या बातम्या काही माध्यमातून प्रसारित झाल्या होत्या. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी या सगळ्या बातम्या भ्रामक असल्याचं सांगितलं. बोटाला लावलेली शाई पुसता येणं शक्य नाही, आणि शाईशिवाय इतरही पुरावे तपासले जात असल्याने, यासंदर्भात केले जाणारे दावे निराधार असल्याचं वाघमारे यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट – राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे**

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्रक्रिया आजपासून सुरू होणार आहे. यामध्ये मराठवाड्यातल्या छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, आणि लातूर, या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचा समावेश आहे. २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरता येणार असून, पाच फेब्रुवारीला मतदान तर सात फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

****

धाराशिव तालुक्यात जिल्हा परिषदेचे १२ गट आणि पंचायत समितीच्या २४ गणांसाठी २७४ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया होणार असल्याचं उपविभागीय अधिकारी ओमकार देशमुख यांनी सांगितलं. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

बीड जिल्ह्यात विविध नगर परिषदांच्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुका बिनविरोध पार पडल्या. बीड इथं राष्ट्रवादी काँग्रेसचे विनोद मुळूक, परळी इथं राष्ट्रवादी काँग्रेसचे कैसर राजा खान पठाण, अंबाजोगाई इथं राजकिशोर मोदी गटाचे दिनेश भराडिया, तर माजलगाव इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सहाल चाउस यांची बिनविरोध निवड झाली.

****

राज्यात सिकलसेलचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये कालपासून 'अरुणोदय' या विशेष तपासणी मोहिमेला सुरूवात झाली. २७ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत सिकलसेलचं लवकर निदान आणि उपचारांचं महत्त्व सांगितलं जाणार आहे.

****

भारतीय खुल्या बॅटमिंटन स्पर्धेत काल लक्ष्य सेननं जपानच्या खेळाडूचा पराभव करत, पुढच्या फेरीत प्रवेश केला. किदंबी श्रीकांत, एच एस प्रणॉय तसंच मालविका बनसोड यांना मात्र पराभवाचा सामना करावा लागला.

****

१९ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात भारताने अमेरिकेचा सहा गडी राखून पराभव केला. जिंबाब्वे इथं झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करत अमेरिकेच्या संघाने ३५ षटकात १०७ धावा केल्या. त्यानंतर पावसामुळे सामना ३७ षटकांचा करुन, डकवर्थ लुईस नियमाच्या आधारे भारताला ९६ धावांचं लक्ष्य देण्यात आलं. अ गटात भारताचा पुढचा सामना बांग्लादेश सोबत होणार आहे.

****